Vol 7 Issue 1 Oct. 2017

ISSN No : 2249-894X

Monthly Multidisciplinary Research Journal

# Review Of Research Journal

Chief Editors

**Ashok Yakkaldevi**
**A R Burla College, India**

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies,
Sri Lanka

**Welcome to Review Of Research**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2249-894X**


Review Of Research Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial Board readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.


## Regional Editor

Manichander Thammishetty
Ph.d Research Scholar, Faculty of Education IASE, Osmania University, Hyderabad.

## *Advisory Board*

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies, Sri Lanka

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Fabricio Moraes de AlmeidaFederal
University of Rondonia, Brazil

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Xiaohua Yang
University of San Francisco, San Francisco

Karina Xavier
Massachusetts Institute of Technology (MIT), USA

May Hongmei Gao
Kennesaw State University, USA

Marc Fetscherin
Rollins College, USA

Liu Chen
Beijing Foreign Studies University, China

Mabel Miao
Center for China and Globalization, China

Ruth Wolf
University Walla, Israel

Jie Hao
University of Sydney, Australia

Pei-Shan Kao Andrea
University of Essex, United Kingdom

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Ilie Pintea
Spiru Haret University, Romania

Mahdi Moharrampour
Islamic Azad University buinzahra Branch, Qazvin, Iran

Titus Pop
PhD, Partium Christian University, Oradea,
Romania

J. K. VIJAYAKUMAR
King Abdullah University of Science & Technology,Saudi Arabia.

George - Calin SERITAN
Postdoctoral Researcher
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences
Al. I. Cuza University, Iasi

REZA KAFIPOUR
Shiraz University of Medical Sciences
Shiraz, Iran

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

Nimita Khanna
Director, Isara Institute of Management, New Delhi

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University, Kolhapur

P. Malyadri
Government Degree College, Tandur, A.P.

S. D. Sindkhedkar
PSGVP Mandal's Arts, Science and Commerce College, Shahada [ M.S. ]

Anurag Misra
DBS College, Kanpur

C. D. Balaji
Panimalar Engineering College, Chennai

Bhavana vivek patole
PhD, Elphinstone college mumbai-32

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary, Play India Play (Trust),Meerut (U.P.)

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Sonal Singh
Vikram University, Ujjain

Jayashree Patil-Dake
MBA Department of Badruka College Commerce and Arts Post Graduate Centre (BCCAPGC),Kachiguda, Hyderabad

Maj. Dr. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

AR. SARAVANAKUMARALAGAPPA
UNIVERSITY, KARAIKUDI,TN

V.MAHALAKSHMI
Dean, Panimalar Engineering College

S.KANNAN
Ph.D , Annamalai University

Kanwar Dinesh Singh
Dept.English, Government Postgraduate College , solan

More.........



**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: http://oldror.lbp.world/**

REVIEW OF RESEARCH

ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.2331(UIF)
VOLUME - 7 | ISSUE - 1 | OCTOBER - 2017



# उच्च प्राथमिक स्तरावर प्रकल्पाधारित इतिहास अध्ययन कार्यक्रम निर्मिती व तिच्या परिणामकारकतेचा अभ्यास

रोहिणी शिवाजी गव्हाणे
पीएच.डी. संशोधिका , टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे.

## प्रस्तावना

इतिहास ही मानवाची स्थलकालाच्या संदर्भातील सर्वांगीण कहाणी असते. इतिहास म्हणजे निव्वळ घटना वर्णन नसून त्यात मूलत: घटनांचा अन्वयार्थ वर्तमानकाळाच्या संदर्भात जावला जातो.

इतिहास हा सर्वसामान्य माणसाच्या उत्सुकतेचा आणि आस्थेचा विषय असतो. कारण इतिहास ही आपली सांस्कृतिक ओळख असते.

इतिहासातील कला, सौंदर्य आणि सजीवता यांच्या उत्कट अविष्कारासाठी इतिहास शिक्षकाला वेगवेगळ्या अध्यापन पद्धतीचा वापर करणे इष्ट ठरते. इतिहास अध्यापनाच्या व्याख्यान पद्धती, गोष्टीरूप पद्धती, प्रवास पद्धती व प्रकल्प पद्धती या वेगवेगळ्या पद्धती आहे.

प्रकल्प पद्धती ही अमेरिकेतील प्रोगेसिव्ह एज्युकेशन या चळवळीचे फलीत आहे. जॉन डयुई आणि त्यांचे शिष्य किलपॅट्रिक यांनी जॉन डयुईच्या सिद्धांताचा विस्तार करून प्रकल्प पद्धतीचा पाया रचला. जॉन डयुईचा शिष्य व प्रकल्प पद्धतीचा उद्गाता किलपॅट्रिक याने कृतीतून शिक्षणाला महत्व दिले आहे. त्याच्या मते कोणतेही ज्ञान हे ज्ञानासाठी नसते, तर ते व्यवहारात आले पाहिजे, त्यामुळे कृती आधी करा, त्यातूनच ज्ञान मिळेल, असे मत प्रतिपादन केले आहे. कृतीतून मिळविलेले ज्ञान हे चिरकाल टिकणारे असते. एका चिनी म्हणीनुसार What I here, I forget; What I see, I remember; but what I do, I never forget. ज्ञान रचनावादाचीही हीच भूमिका आहे. कृतिशीलतेमुळे विद्यार्थी स्वत: प्रत्येक बाब हाताळत असतात. निरीक्षण करत असतात, त्यातून विषयाची दैनंदिन जीवनाशी, व्यवहाराशी सांगड घातली जाते. समस्या म्हणून दिलेला विषय हाताळण्यासाठी माहितीचे विविध स्त्रोत हाताळले जातात. त्यातून वैविध्यपूर्ण माहिती मिळते. ज्ञान एकांगी न राहता अनेकांगी बनते. प्रकल्प अभ्यासात मुलांच्या इच्छेला आणि स्वयंप्रेरणेला महत्व आहे. विविध विषयांची एकात्मकता साधणारे अध्ययनाचे प्रकल्प हे प्रभावी साधन आहे.

प्रकल्पाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना स्वत:च्या गतीने, स्वयंअध्ययनातून, पाठयपुस्तकाबाहेर जाऊन शिकण्याची वृत्ती वाढते. प्रकल्प पद्धतीमुळे विद्यार्थ्यांला प्रयोगशील, उपक्रमशील बनवता येईल. त्यांचा उत्साह, क्रियाशील सहभाग यातून नव्या बदलाचे स्वागत व परिचय, वैचारिक देवाणघेवाण, विषयाचा सखोल अभ्यास, अनुभवसमृद्ध ज्ञानही मिळेल. येऊ घातलेल्या व्यावसायिक ज्ञानाला विद्यार्थी समर्थपणे सामोरे जाऊ शकतील. विषयाचा व्यापक विचार अध्ययनाच्या दृष्टीने करण्यासाठीचे प्रकल्प हे प्रभावी माध्यम आहे.

## संशोधनाची गरज आणि महत्व

इतिहास विषयांतर्गत विद्यार्थी केंद्रभूत ठेवून अध्यापन करताना विद्यार्थ्याच्या उपक्रमशीलतेला योग्य दिशा मिळेल काय? या विषयी उत्सुकता वाटली म्हणून विद्यार्थ्यामध्ये इतिहास विषयाबद्दल आवड निर्माण करण्यासाठी विद्यार्थ्यांना स्वयंअध्यनासाठी सवय निर्माण करण्यासाठी व इतिहास विषयाच्या ज्ञान प्राप्तीसाठी समस्या निराकरणाची क्षमता विद्यार्थ्यामध्ये विकसित होण्यासाठी जीवनकौशल्ये वाढीसाठी व विद्यार्थ्यांमध्ये नाविन्यपूर्ण कल्पना कृतीत आणण्याची संधी मिळण्यासाठी प्रस्तुत संशोधनाची गरज आहे.

इतिहास विषयातील निवडक पाठयांशाचे अध्यापन प्रकल्प अध्यापन पद्धतीने केल्याने धनात्मक बदल विद्यार्थी अध्ययनात जाणविल्यास संबंधित संशोधन खालील घटकांच्या दृष्टीने विशेष महत्वपूर्ण ठरेल.

### विद्यार्थी

प्रकल्प अध्यापन पद्धतीमधील कृतीशीलतेच्या प्राधान्यतेमुळे विद्यार्थ्यांमधील सुप्त क्षमता समजतील, स्वयंअध्ययनास चालना मिळेल, स्वयंसंशोधन स्वयंअध्ययन क्षमता वाढीस लागेल व सृजनशीलतेस चालना मिळेल.

### शिक्षक

प्रकल्प पद्धतीची परिणामकारकता लक्षात घेता इतिहास विषयातील काही घटक प्रकल्प अध्यापन पद्धतीने घेतले जावेत ही जाणीव शिक्षकांमध्ये होईल.

शाळेत मिळणाऱ्या ज्ञानाबरोबर त्यांची अनुभवांची सांगड घालून ज्ञाननिर्मितीची क्षमता विकसित करण्याच्या दृष्टीने सदर संशोधनाचे महत्व आहे.

## समस्या विधान

उच्च प्राथमिक स्तरावर प्रकल्पाधारीत इतिहास अध्ययन कार्यक्रम निर्मिती व तिच्या परिणामकारकतेचा अभ्यास.

## समस्येची तात्त्विक कारणमिमांसा

इतिहास विषयात विषयांतर्गत या प्रकल्प पद्धतीमुळे विद्यार्थ्यांच्या उपक्रमशीलतेला, सर्जनशीलतेला आणि कृतीपूर्ण अध्ययनास वाव मिळेल आणि त्याचे आकलन होऊन उपयोजन होईल असे संशोधिकेस वाटते. इतिहास विषयातील निवडक पाठांचे प्रकल्प अध्यापन पद्धतीने अध्यापन करते वेळी त्या पाठयांशा नुसार कोणता प्रकल्प राबवावा, त्यासाठी पूर्वतयारी कोणती करावी या सर्व बाबींचा विचार करून प्रकल्पधारित अध्ययन कार्यक्रम तयार करतेवेळी विद्यार्थ्यांना अध्ययनात येणारी निरसता टाळता यावी हा यामागचा उद्देश आहे.

## संशोधनाची उद्दिष्टे

१) प्रकल्पाधारित इतिहास अध्ययन कार्यक्रमाची निर्मिती करणे.

२) प्रकल्पाधारित अध्ययन कार्यक्रमाच्या परिणामकारकतेचा अभ्यास करणे.
३) पारंपारिक अध्यापन पद्धती व प्रकल्पाधारित अध्ययन कार्यक्रम यातील संपादनाची तुलना करणे.

### संशोधनाच्या कार्यात्मक व्याख्या

**१) प्रकल्प पद्धती**

उद्दिष्टांच्या पूर्तीसाठी हेतुपूर्वक केलेला इतिहास विषयाचा उपक्रम किंवा कृतींचा अध्ययनात वापर म्हणजे प्रकल्प पद्धती.

**२) इतिहास विषय**

महाराष्ट्र राज्य शैक्षणिक व संशोधन प्रशिक्षण परिषद, पुणे यांनी ठरवून दिलेल्या अभ्यासक्रमातील एक विषय.

**३) परिणामकारकतेचा अभ्यास**

प्रकल्पाधारित अध्यापन पद्धतीद्वारे अध्यापन केल्यानंतर विद्यार्थ्यांच्या आकलन, माहिती संपादन आणि प्राविण्य याबाबत होणाऱ्या बदलांचा अभ्यास.

**४) प्रकल्पाधारित इतिहास अध्ययन कार्यक्रम निर्मिती**

इतिहास विषयातील भारतीय प्रबोधन व समतेचा लढा  या पाठयांशावर विद्यार्थ्यांच्या विविध उपक्रम कृती, गटसादरीकरण, वक्तृत्व स्पर्धा, निबंध स्पर्धा, पॉवर प्रेझेंटेशनसाठी घटकानुसार स्लाईड तयार करणे व विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या हस्तलिखितांचे प्रदर्शन भरवणे व त्या अनुषंगाने अध्ययन म्हणजेच प्रकल्पाधारित इतिहास अध्ययन कार्यक्रम निर्मिती.

### १) संशोधकाची गृहीतके

इतिहास विषय अध्यापनासाठी व्याख्यान पद्धती, चर्चा पद्धती, नाटयीकरण पद्धती, आधार पद्धती, कथन पद्धती, गोष्टीरूप पद्धती, प्रवास पद्धती आणि प्रकल्प पद्धती यांचा समावेश होतो.

२) इतिहास अध्ययनात प्रकल्प याचा अर्थ निरीक्षण करणे, संपर्क करणे, मजकूर, माहितीचे विविध स्त्रोत हाताळणे व त्यांच्या नोंदी ठेवण्यापर्यंतच गृहित धरलेले आहे.

### संशोधनाची परिकल्पना

धन परिकल्पना-प्रकल्पाधारित इतिहास अध्ययन कार्यक्रमाच्या निर्मितीनुसार अध्यापन केल्यानंतर विद्यार्थ्यांच्या संपादनावर होणारा परिणाम हा पारंपारिक अध्यापन केल्यानंतर होणाऱ्या संपादनापेक्षा अधिक उच्च राहील.

### संशोधन समस्येची व्याप्ती व मर्यादा

**व्याप्ती**

१) पुणे जिल्हयातील उच्च प्राथमिक वर्ग स्तर असलेली मराठी माध्यमाची माध्यमिक शाळेची निवड संशोधन कार्यासाठी करण्यात आलेली आहे.
२) संबंधित संशोधन पारंपारिक पद्धती व प्रकल्पाधारीत इतिहास अध्ययन पद्धती यांच्याशी संबंधीत असणार आहे.

**मर्यादा**

१) प्रस्तुत संशोधनासाठी फक्त मराठी माध्यमाच्या माध्यमिक शाळेचा विचार करण्यात आलेला असून सदरचे संशोधन इ. ८ वी च्या वर्गा पुरते मर्यादित आहे.
२) उच्च प्राथमिक स्तरावर विविध विषय आहे पण त्या विषयापैकी इतिहास विषयातील भारतीय प्रबोधन व समतेचा लढा या घटकांपुरते सदरचे संशोधन मर्यादीत आहे.

### संशोधन पद्धती

सदर संशोधनासाठी प्रायोगिक पद्धतीचा अवलंब करण्यात आलेला आहे. अभिकल्प - सदर संशोधनासाठी द्विगट अभिकल्प वापरण्यात आला आहे.

### संशोधनाशी निगडीत चले

१) स्वाश्रयी चल - अध्यापन
२) आश्रयी चल - संपादन चाचणीतील गुण
३) नियंत्रित चल - वय, लिंग

### नमुना निवड

नव महाराष्ट्र विद्यालय खराबवाडी, चाकण या शाळेची निवड प्रासंगिक पद्धतीने करून शाळेतील इयत्ता ८ वी तील ८० विद्यार्थ्यांची निवड केली.

### माहिती संकलनाची साधने

प्रस्तुत संशोधनामध्ये भारतीय प्रबोधन व समतेचा लढा या निवडक पाठांवर आधारित स्वनिर्मित संपादन चाचणीचा उपयोग माहिती संकलन करण्याकरीता केला. मिळालेल्या गुणांवरून मध्यमान, प्रमाणविचलने काढली. दोन्ही मध्यमानांच्या प्रमाणत्रुटी काढून त्यावरून मध्यमानातील फरक (D) काढला. मध्यमानाच्या फरकाच्या त्रुटीवरून क्रांतिके गुणोत्तर काढले. त्याची सार्थकता पाहिली व त्यावरून परिकल्पनेचा स्वीकार करावा की त्याज्य करावी याबाबत निर्णय घेण्यात आला.

## संकलित माहितीचे विश्लेषण

| उत्तर चाचणीतील गुणांचे मध्यमान | |
|---|---|
| नियंत्रित गट | प्रायोगिक गट |
| M1 = ३८.०३ | M2 = ४३.९१ |
| M2 - M1 = ४३.९१ – ३८.०३ = ५.८२ | |

## माहितीचे अर्थनिर्वचन

| गट | df | Mean | SE | SE DM / 6 DM | क्रांतिक गुणोत्तर | सारणीतील CR मूल्य |
|---|---|---|---|---|---|---|
| पूर्व चाचणी | ४० | M1 – M2 | ०.९५ | | १.०१ ०.०१ | ०.०५ |
| उत्तर चाचणी | ४० | ५.८२ | ०.३५ | ०.०१ | ५.९३ २.७० | २.०२ |

सारणीत दर्शविलेल्या विद्यार्थ्यांच्या दोन्ही गटास भारतीय प्रबोधन व समतेचा लढा  या पाठाचे अध्यापन केल्यानंतर सर्वात शेवटी या पाठाच्या उत्तर चाचणीत मिळालेल्या गुणांवरून मध्यमान, प्रमाणविचलने, दोन्ही मध्यमानांच्या प्रमाणत्रुटी, मध्यमानातील फरक (D) आणि मध्यमानाच्या फरकाच्या त्रुटीवरून क्रांतिक गुणोत्तरांची सार्थकता पाहिली व नियंत्रित गटापेक्षा प्रायोगिक गटाला मिळालेले गुण जास्त आहे असे आढळले.

याचाच अर्थ प्रकल्पाधारित इतिहास अध्ययन कार्यक्रमाच्या निर्मितीनुसार अध्यापन केल्यानंतर विद्यार्थ्यांच्या संपादनावर होणारा परिणाम हा पारंपारिक पद्धतीने अध्यापन केल्यानंतर होणाऱ्या संपादनापेक्षा अधिक आहे.

## निष्कर्ष

१) इयत्ता आठवीच्या इतिहास विषयाच्या भारतीय प्रबोधन व समतेचा लढा  या पाठयांशाचे पारंपारिक अध्यापन करणे हे आधिक परिणामकारक ठरते.
२) यावरून इतिहास विषयाच्या अध्ययनासाठी संबंधित विषय प्रकल्प पद्धतीने घेतला तर विद्यार्थ्यांच्या विषयातील संपादन गुणांत वाढ झाली.

## शिफारशी

१) राज्यस्तरीय भरीव प्रशिक्षण कार्यकमांत प्रकल्प  पद्धत कशी राबवावी त्यासाठी वार्षिक नियोजन, घटक नियोजन कसे करावे याचे प्रशिक्षण शिक्षकांना मिळावे.
२)  शाळेच्या संस्था प्रमुखांनी शाळेमध्ये प्रकल्प पद्धतीने अध्यापन करण्यासाठी आवश्यक असणारे संदर्भ ग्रंथ शाळेस उपलब्ध करून द्यावेत.
३) प्रकल्प पद्धतीच्या कार्यवाही विषयक तज्ञ व्यक्तींचे त्या विषया संदर्भात शिक्षकांसाठी शाळा स्तरावर व्याख्याने आयोजन करावीत.
४) इतिहास विषयात पाठयांशावर कोणते प्रकल्प राबविता येईल त्याची निवड व विषयाची यादी तयार करावी व त्याप्रमाणे प्रकल्प राबवावेत.

## संदर्भ ग्रंथ सूची

१)  चव्हाण, कि. (२०१०). शिक्षणातील मर्मदृष्टी  नाशिक; इनसाईट पब्लिकेशन.
२) भिंताडे, वि. (२००५). शैक्षणिक संशोधन पद्धती,  पुणे;  नूतन प्रकाशन.
३) देसले, स.आणि भदाणे, म. (२००९).शैक्षणिक मूल्यमापन व संख्याशास्त्र. नाशिक; रेशमाई पब्लिकेशन.
४)  जोशी, अ. (१९९९). आशययुक्त अध्यापन. नाशिक; यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ.
५)  करंदीकर, सु. आणि मंगरूळकर, मी.(२००३).मराठी आशय अध्यापन पद्धती, कोल्हापूर; फडके प्रकाशन.
६)  वाजे, स. आणि बरकले, रा. (२००५).इतिहासाचे अध्यापन शास्त्रीय विश्लेषण नाशिक; आदित्य प्रकाशन.
७) बोरसे.सि.(२०११) इतिहास अध्यापनासाठीची अभिनव पद्धत;अध्यापन प्रभावांचा तुलनात्मक अभ्यास पीएच.डी. अहवाल, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे.

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Books Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

* Directory Of Research Journal Indexing
* International Scientific Journal Consortium Scientific
* OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- DOAJ
- EBSCO
- Crossref DOI
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database

Review Of Research Journal
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : http://oldror.lbp.world/